| MHBI060001022026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०२६. |
|---|---|
| | रुक्मीण रावसाहेब जाधव व इतर<br>वि.<br>निरंक |

## निशाणी क्र. १ वरील आदेश
## (घोषित दिनांकः १८ मार्च, २०२६)

अर्जदार क्र. १ ते ५ यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) अर्जदारांचे थोडक्यात असे कथन की, मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप हे अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडिल आहेत. मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे दिनांक ०३/१०/२०१७ रोजी अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे निधन झालेले आहे. मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे मृत्यू पश्चात अर्जदार क्र. १ ते ५ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ यांनी ते मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज केलेला आहे. अर्जदार यांना विविध शासकीय, निमशासकीय तसेच विविध सरकारी कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब, अर्जदारांनी ते मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे कायदेशीर वारस घोषित होऊन वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सूचना व जाहीर प्रगटन दिल्याप्रमाणे "दैनिक अंबेजोगाई टाईम्स' या वृत्तपत्राच्या दिनांक २१/०१/२०२६ रोजीच्या अंकात प्रकाशित करण्यात आले व या अर्जाबद्दल संबंधितांना जर काही आक्षेप

असेल तर त्यांनी याबाबत न्यायालयास लेखी कळविण्याविषयी सूचित करण्यात आले परंतु अद्यापपावेतो असा कोणताही आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

४) पुढील प्रश्न माझ्या विचारार्थ येतात, त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदार क्र. १ ते ५ हे पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

**– कारणमिमांसा –**

**प्रश्न क्र. १ करिता** –

५) अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार क्र. ४ भैरवनाथ यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि. क्र. ११) सादर केले. मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे मृत्यु दाखल्याची प्रत (नि.क्र. ०६), अर्जदारांच्या आधारकार्डाच्या पडताळीत प्रती(नि.क्र. १३ ते १७), जाहीर प्रगटन (नि. क्र. ०७), जाहिरनामा (नि.क्र. १०) व पुरावा बंद पुरसीस (नि. क्र.२०) इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. ज्या मजकुराचा अर्जात उल्लेख आहे तोच मजकूर अर्जदाराने शपथपत्रात पुन्हा कथन केलेला आहे.

६) अर्जदारांतर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधित आहे तसेच अर्जदारांनी हा जो अर्ज दाखल केला आहे त्याबाबत जाहीर प्रगटन (नि. क्र. ०७) दिल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. मयत कै.

आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे मृत्युप्रमाणपत्र हे दाखल आहे. त्यावरुन ते दिनांक ०३/१०/२०१७ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर आलेले आहे. अर्जदार क्र. २ यांनी त्यांच्या निशाणी क्र. ११ वरील शपथपत्रात अर्जदार क्र. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नसलेबाबत कथन केलेले आहे. हिंदु वारसा कायदा–१९५६ वर्ग–१ मधील परिशिष्ठानुसार हिंदु पुरुषाच्या मृत्युनंतर आई, पत्नी, मुले व मुली हे वर्ग–१ चे वारस आहेत. त्यामुळे, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे हिंदु वारसा कायदा–१९५६ च्या परिशिष्ठानुसार वर्ग–१ चे वारस आहेत असा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

७) बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये मयताच्या वारसास त्यांचा मयताच्याबाबतचा औपचारीक हक्क न्यायालयाकडून मान्य करुन घ्यावयाचा असल्यास ते बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये अर्ज करु शकतील. तसेच, उद्घोषणेच्या कालावधीनंतर आणि कुठलेही आक्षेप आलेले नसल्यानंतर न्यायालय मयताच्या वारसाबाबतचा पुरेसा पुरावा अभिलेखावर घेवुन ॲपेंडीक्स–बी अन्वये मयताच्या वारसांना ते मयताचे औपचारीक वारस असल्याचे प्रमाणपत्र तात्काळ देतील.

८) वर नमुद केलेल्या कायदेशिर तरतुदीप्रमाणे अर्जदार यांनी ते मयताचे कायदेशिर वारस असल्याचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणलेला आहे. त्याप्रमाणे ते मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे कायदेशिर वारस असल्याचे मत मी नोंदविलेले आहे. तसेच, अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राची विविध शासकीय, निमशासकीय तसेच विविध कार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे. वर नमुद केलेल्या जाहिर प्रकटनानंतर कोणीही हरकत नोंदवली नसल्याने अर्जदार यांच्या लाभात बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये मयताचे औपचारीक वारस प्रमाणपत्र हे वर

नमुद कामासाठी वारस म्हणून अर्जदार यांचे नांव लागणेसाठी देणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>प्रश्न क्र. २ करिता</u>** –

९) अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र हे अर्जदार यांचे नावे मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला असल्याने बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम ३ अन्वये ॲपेंडीक्स–ब प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१०) भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३९० अन्वये बॉम्बे रेग्युलेशन अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास भारतीय कायदा कलम ३९० लागू असून त्या अन्वये कोर्ट फी ॲक्ट अन्वये योग्य तो मुद्रांक लावणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन अन्वये देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास देखील महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट लागू असल्याने अर्जदारांनी महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्टचे परिशिष्ट क्र.१ चे आर्टीकल १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्टीकल १० व ११ अन्वये न्यायालयीन मुद्रांक भरणे आवश्यक व जरुरीचे आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी प्रश्न क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१) रुक्मीण रावसाहेब जाधव, २) रुक्मीणबाई साहेबराव गरड, ३) लक्ष्मीबाई भास्कर सोनवणे, ४) भैरवनाथ आत्माराम जगताप व ५) हरिश्चंद्र आत्माराम जगताप हे मयत कै. आत्माराम पि. विश्वनाथ जगताप यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन तरतुदींचे ॲपेंडीक्स 'ब' प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार क्र. १ ते ५ यांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क न्यायालयात जमा करावे.

५. बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद नंबर ३१२ अन्वये वारस दाखल्यामध्ये तशी टिप ठेवण्यांत यावी.

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2026.03.25 17:18:45 +0530

दिनांकः– १८/०३/२०२६.
स्थळः– अंबाजोगाई.

( **प्रविण प्र. सागडे** )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
अंबाजोगाई

| :: **Certificate of Stenographer** :: | | |
|---|---|---|
| "I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order." | | |
| Dictated On : | 18/03/2028. | Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE Date: 2026.03.27 10:58:38 +0530<br>**( Akash Kabne )**<br>Stenographer Grade – 3<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai. |
| Transcribed On : | 18/03/2028. | |
| Checked & Signed On : | 18/03/2028. | |
| Date :<br>Place : Ambajogai. | 18/03/2028. | |